कृविके/प्रका/पशू संवर्धन/०९/२०२२-२३

# कृषि विज्ञान केंद्र


सांगवी (रेल्वे) ता. दारव्हा जि. यवतमाळ
(यवतमाळ-२)

ईमेल: kvkyavatmal2@gmail.com वेबसाईट:www.kvksangvi.co.in


## पशुधनातील लंम्पी स्किन डिसीज (एल एस डी)

### रोगप्रसार:

- डास, चावणा-या माश्या.
- गोचीड, चिलटे.
- बाधित जनावराचा स्पर्श.
- दुषित चारा पाणी.

### कारणे:

या रोगाचा संसर्ग " कँप्रीपाँक्स " (Capri Pox) विषाणू मुळे होतो. हा विषाणू शेळया व मेंढयांमधील देवी रोगाच्या विषाणुशी संबंधित आहे.



### लक्षणे:

- अंगावर १० ते २० मी.मी. व्यासाच्या गाठी.
- सुरवातीस भरपूर ताप.
- डोळ्यातून नाकातून चिकट स्त्राव.
- चारा पाणी खाणे कमी अथवा बंद.
- दुध उत्पादन कमी.
- काही जनावरात पायावर सूज येणे व लंगडणे.

### पशु पालकांनी घ्यावयाची काळजी:

- बाधित जनावरे निरोगी जानावरापासून, वेगळी ठेवणे,
- कोणत्याही संभाव्य रोगी जनावरास निरोगी जनावरांच्या कळपात प्रवेश बंद करणे.
- रोग प्रादुर्भाव झालेल्या गावातील बाधित व निरोगी जनावरांना चराउ कुरणांमध्ये एकत्रित सोडण्यास मनाई करणे.
- डास, गोचीड व तत्सम किड्यांचा बंधोबस्त करणे, तसेच निरोगी जनावरांच्या अंगावर किडे न चावण्या साठी औषध लावणे व गोठ्यामध्ये यासाठीच्या औषधांची फवारणी करणे.
- रोग प्रादुर्भाव क्षेत्रातील जनावरांना रोग प्रादुर्भाव नसलेल्या ठिकाणी तसेच स्थानिक बाजारांमध्ये नेण्यास प्रतिबंध करणे.
- संध्याकाळी गोठ्यामध्ये धूर करणे.

तात्काळ नजीकच्या पशुवैध्यकिय दवाखान्याशी संपर्क साधून उपचार करून घ्यावेत.
त्वचेवरील गाठीचे जखमेत रुपांतर झाल्यास जखमेत जंतू पडू नये यासाठी जखमेवर औषध मलम लावावे.

### प्रतिबंध:

पशुवैधकाच्या मार्गदर्शनानुसार लसीकरण करून घ्यावे.



**लम्पी आजाराला त्वरित घाला आळा ॥**
**पशुपालकांनो आपले पशुधन सांभाळा ॥**